# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

फोन नं).०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in, Email – purchase@sai.org.in)


## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागासाठी झेरॉक्स पेपर खरेदीकामी पुरवठाधारक, वितरक, नामांकित उत्पादक कंपन्या यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी-शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.१४/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.२७/०८/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदाधारकास साहित्य पुरवावयाची हमी म्हणून रु. ५०,०००/- (अक्षरी रु. पन्नास हजार) मात्र बयाणा रक्कम व निविदा फी रु. ३,०००/- (अक्षरी रु. तीन हजार मात्र) www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर online भरावी लागेल.

४. निविदाधारकाने सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.२९/०८/२०१९ रोजी उघडण्यात येतील.

६. कोणतीही निविदा अंशत: / पुर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**(दी.म. मुगळीकर, भा. प्र. से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

## शिरडी ४२३ १०९.

## तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर


दुरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२, २५९१८०

फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

मुंबई कार्यालय - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४ दुरध्वनी क्रमांक (०२२२) २४१६६५५६


**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी करिता**
**विविध साईजमध्ये झेरॉक्स पेपर पुरविणेबाबतची ई-निविदा**

२/७७८

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## निविदाधारकांसाठी सूचना

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.

२. निविदा फी रक्कम रु.३,०००/- (रु.तीन हजार मात्र) व बयाणा रक्कम रु. ५०,०००/- (रू.पन्नास हजार) मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. ई-निविदा भरतांना GST व इतर शासकीय कर, पॅकिंग व फॉरवडींग, वाराई, हमाली व वाहतूक वगैरे सर्व खर्चासह दर नमूद करावेत.

४. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांची राहील.

५. सदर निविदा दि.१४/०६/ २०१९ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. २८/०६ /२०१९ सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

६. ई-निविदेसोबत फक्त ऑनलाईन कागदपत्रे सादर करावयाची आहेत. हार्ड कॉपीमध्ये कागदपत्रे सादर करू नयेत. हार्ड कॉपीमध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

७. शक्य झाल्यास दि. २९ / ०६ /२०१९ रोजी ई-निविदा Technical Bid उघडण्यात येईल.

८. कोणतीही निविदा अंशत:/ पुर्णपणे स्विकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

९. सदर खरेदीची ई-निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियमावलीनुसार राबविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

(दी.म. मुगळीकर, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिर्डी– ४२३ १०९ तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर

### निविदेच्या शर्ती व अटी

१. पुरवठा करावयाचे झेरॉक्स पेपरचा तपशिल सोबतचे परिशिष्टात (BOQ मध्ये) दिलेला आहे. त्यानुसार निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. निविदे सोबत अदयावत दुकान नोंदणी दाखला, पॅन कार्ड, GST Number Certificate किंवा ऑनलाईन GST Number Registration Receipt वगैरे सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

३. झेरॉक्स पेपरचे दर भरतांना GST सह दर भरावेत. पुरवठा कालावधीत GST च्या दरात शासनाकडून वाढ किंवा घट झाल्यास त्यानुसार देयक आदा करण्यात येतील. तसेच झेरॉक्स पेपरचे प्रती पॅकेटचे दर भरतांना GST, वाराई, वाहन हॉल्टींग चार्जेस, पॅकींग व फॉरवर्डिग खर्च, शासकीय कर, TDS व शिर्डी संस्थानचे भांडार विभागात पोहोचचे वाहतुक खर्चासह सर्व समावेशक ऑनलाईन दर भरावेत.

४. पुरवठा आदेशातील प्रत्येक प्रकारचा २५% पेपर पुरवठा आदेश दिलेपासून ३० दिवसांत व उर्वरीत पेपर ९० दिवसांत पुरवावा लागेल किंवा पुरवठाधारकाने सर्व पेपर एकदम पुरविल्यास त्यास काहीही हरकत नाही. एकुण सर्व झेरॉक्स पेपरचा पुरवठा पुरवठा आदेश दिलेपासून १२० दिवसांचे आत करावा लागेल.

५. कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक असणार नाही.

६. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांची निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत झेरॉक्स पेपरचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर पुरवठा आदेश एकुण रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर १५ दिवसाचे आत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. सुरक्षा अनामत रक्कम सुरळित पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

७. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरित शिर्डी येथे समक्ष येऊन, रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.

८. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

९. मंजुर झालेल्या व मान्य दराने पुरवठा आदेशातील स्पेसिफिकेशनप्रमाणे झेरॉक्स पेपरचा पुरवठा करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही.

१०. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कपाती बिलातून करण्यात येतील.

...२...

९/३१८

११. मागणी केलेले सर्व पेपर हे पुरवठा आदेशात दर्शविलेल्या वर्णनाचे पुरवावे लागेल. कमी दर्जाचे, वेगळयाच प्रकारचे स्विकारले जाणार नाही. ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे हे निविदाधारकावर बंधनकारक राहील. त्याप्रमाणे ते न नेल्यास, त्याचे होणारे नुकसानीस संस्थान जबाबदार राहणार नाही.

१२. पुरविलेल्या झेरॉक्स पेपरचे बिल त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच तपासणी करून ३० दिवसांचे आत आदा करणेचा प्रयत्न राहील. आवश्यकतेनुसार शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून झेरॉक्स पेपरची तपासणी करणेत येईल.

१३. नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५ % जादा झेरॉक्स पेपरची मागणी संस्थानकडून झाल्यास जादा झेरॉक्स पेपरचा पुरवठा मान्य दरानेच करण्याचे निवदिधारकावर बंधनकारक राहील.

१४. सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

१५. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासन खरेदी नियमावलीतील नियम क्र. ३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्यूनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार द्वितीय न्यूनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील द्वितीय न्यूनतम दरधारक जर न्यूनतम दर धारकाच्या दरात माल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या ५० टक्के मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादारांना देण्यात येतील व जर तयार नसतील तर पूर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादारांना देण्यात येईल.

१६. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत

**<u>आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-</u>**

१७. पुरवठा आदेशातील झेरॉक्स पेपर मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या झेरॉक्स पेपरची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या झेरॉक्स किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

१८. झेरॉक्स पेपरचा पुरवठा वेळेवर न केल्यास अगर ठरवून दिलेल्या मुदतीत न झाल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून व्दितीय, तृतीय न्युनतम दरधारकांकडून अथवा बाजारभावाने आवश्यक तेवढे किंवा दिलेल्या पुरवठा आदेशाइतके पेपर खरेदी करण्यात येऊन, त्यासाठी जादा लागलेल्या फरकाची रक्कम आपले बिलातून अथवा सुरक्षा अनामत रकमेतून वसुल करणेत येईल. अनामत रकमेची मर्यादा ठरविल्याप्रमाणे कायम राहील.

१९. झेरॉक्स पेपरचा पुरवठा पुर्ण न केल्यास दंडात्मक कारवाई म्हणून आपली सुरक्षा अनामत रक्कम संस्थान खाती जमा करणेत येईल व आपले संस्थेला काळया यादीत समाविष्ठ करण्यात येईल.

(दी.म. मुगळीकर, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

ऑफीस ------------------------------------------------------------

दुकान ------------------------------------------------------------

निवास ------------------------------------------------------------

मोबाईल नंबर ------------------------------------------------------------

फॅक्स नंबर ------------------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------------------

दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे- १. ------------------------------------------------------------

२. ------------------------------------------------------------

६. फर्मचे बॅक खाते माहिती:- १. बॅक खाते नाव:- ------------------------------------------------

२. शाखा:- ------------------------------------------------------------

३. खाते नंबर व प्रकार:------------------------------------------------------------

४. बॅक IFSC कोड:------------------------------------------------------------

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

३१२

# Technical Bid मधील कागदपत्रे

१. अदयावत दुकान नोंदणी दाखला

२. GST Number Certificate किंवा ऑनलाईन GST Number Registration Receipt

३ पॅन कार्ड

निविदाधारकाची सही व शिक्का

प्रति,
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय–संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी करीता विविध साईजमध्ये झेराक्स पेपर ~~रिम~~ पॅकेट पुरविण्याची ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या पेपरचा, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. संस्थानला गरज पडल्यास पुरवठा आदेशातील परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त पेपरची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

झेरॉक्स पेपरची निविदा मंजुर झालेनंतर मान्य दराने पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर पेपरच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. अशी रक्कम मी भरणा न केल्यास, बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच यानंतरही सुरक्षा अनामत रक्कम पुर्ण होऊ शकली नाही, तर उर्वरीत सुरक्षा अनामत रक्कम मी पुरविलेल्या मालाचे बीलातून कपात करण्यासही माझी संमती आहे. त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे पेपर वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक -     /     /२०१९
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

### संस्थानचे विविध विभागासाठी झेरोक्स पेपर खरेदी - BOQ

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per packet | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | झेरॉक्स पेपर लिगल-१३x८ F/S)- कंपनी-जे.के/रजत/स्पॅक्ट्रो/तत्सम ८० जीएसएम, (५०० शीट्स=१ पॅकेट) | 4,000 | पॅकेट | | |
| 2 | झेरॉक्स पेपर छोटे-११x८ (A4)- कंपनी-जे.के/रजत/स्पॅक्ट्रो/तत्सम ८० जीएसएम, (५०० शीट्स=१ पॅकेट) | 5,000 | पॅकेट | | |
| 3 | स्टेंटमेंट साईज झेरॉक्स पेपर- (A3)- कंपनी-जे.के/रजत/स्पॅक्ट्रो/तत्सम ८० जीएसएम, (५०० शीट्स=१ पॅकेट) | 40 | पॅकेट | | |

( D. M. MUGLIKAR, IAS)

Chief Executive Officer

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi